# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/१०/२०२५ ( गुरूवार )**

---

## पोलीस खापा अंतर्गत रेकॉर्डवरील सात गुन्हेगारांना करण्यात आले हद्दपार तसेच एका गुन्हेगाराला एम.पी.डी.ए कायदयान्वये करण्यात आले स्थानबध्द

पोलीस स्टेशन खापा अंतर्गत अभिलेखावरील, अवैध दारुचा व्यवसाय करणारे,अवैध सटटापटी चालविणारे गुन्हेगार यांचेवर वारंवार कार्यवाही करुन तसेच प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन सुध्दा खालील नमुद आरोपीतांनी त्यांचे गुन्हेगारी कृती निरंतर ठेवल्याने जनसामान्यांमध्ये असुरक्षतेची भावना निर्माण झाली. तसेच सध्या सुरू असलेले व आगामी येणारे सणोत्सव आणि आगामी काळात निवडणुक असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी मा.श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण आणि श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनात खापा पोलीसांनी आरोपी **नामे १) दादाराव सुभाष हरकरे, वय ४० वर्षे, रा. कोथुळना २) अनिकेत साहेबराव कावनपुरे, वय २६ रा.खापा ३) रावजी मोहन परतेकी, वय ४० वर्षे, रा. सिंदेवानी ४) अक्षय उर्फ कोमल दिपक लखपती, वय २७ वर्षे, रा.खापा ५) दिनेश यशवंत उईके, वय २७ वर्षे, रा.ढकारा ६) शांताराम रामचंद्र जनबंधु, वय ६० वर्षे, रा.वाकोडी ७) राजेश मधुकर बारापात्रे, वय ३५ वर्षे, रा.हनुमान घाट खापा** यांना नागपुर जिल्हयातुन हद्दपार करण्याचा प्रस्ताव उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांच्या कडे पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावास मंजुरी मिळाली असुन आरोपीतांना नागपुर जिल्हयातुन ,नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण हद्दीतुन हद्दपार करण्यात आले आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी नागपुर यांचेकडे आरोपी नामे **निलेश शेषराव निळे, वय ४० वर्ष रा.माताखेडी** याचा एम.पी.डी.ए. कयादयान्वये प्रस्ताव सादर केला असुन मा.जिल्हाधिकारी यांनी नमुद आरोपीचा स्थानबध्दतेचा आदेश पारीत केल्याने नमुद आरोपीला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल करण्यात आले.



दादाराव सुभाष हरकरे



अनिकेत साहेबराव कावनपुरे



अक्षय उर्फ कोमल दिपक लखपती



दिनेश यशवंत उईके



शांताराम रामचंद्र जनबंधु




राजेश मधुकर बारापात्रे




निलेश शेषराव निळे

## अवैधरीत्या गांजा (अंमली पदार्थ) बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, १ किलो ६०८ ग्रॅम गांजा जप्त कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक ०९/१०/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फतीने खबर मिळाली की, आरोपी नामे **सुंदरसिंग महेद्रसिंग बावरी, वय २७ वर्ष, रा. ब्रम्हणी, वैशालीनगर, वार्ड नं ०३, ता कळमेश्वर, जि.नागपुर** हा त्याचे राहते घरी गांजा अंमली पदार्थ बाळगुन त्याची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नमुद आरोपीच्या घरी जावुन पंचासमक्ष त्याच्या घराची झडती घेतली असता हीरव्या रंगाची पाने, फुले, देठ असलेली गांजा सदृष्य सुकलेली वनस्पती मिळुन आली. पोलीसांनी १ किलो ६०८ ग्रॅम अंमली पादार्थ गांजा किंमती ४०,२०० आणि ईलेक्ट्रिक वनज काटा किंमती ५००/— रूपये असा एकुण ४०,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अधिक चौकशी केली असता नमुद आरोपीने सदरचा अमली पदार्थ गांजा आरोपी नामे **महेंद्र डालचंद ठाकुर, वय**

**३१ वर्षे, रा वार्ड ०३ दहेगाव, वार्ड नं ०३, ता.कळमेश्वर, जि.नागपुर** याचे कडुन विकत घेतल्याचे सांगितले.

**नमुद दोन्ही आरोपीतांविरुध्द पोस्टे कळमेश्वर येथे एन.डी.पी.एस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन्ही आरोपीतांना पोलीसांनी तात्काळ अटक केली असुन दोन्ही आरोपी दिनांक १३/१०/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे.**

## मौजा उमठा पारधीबेडा येथे ड्रोन कॅमेऱ्या द्वारे पेट्रोलींग करून अवैधरित्या मोहाफुल दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूध्द नविन कायदयान्वये कारवाई, ३ आरोपी अटक भा.न्या.सं कलम १२३ आणि दारू बंदी कायदयान्वये गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत दिनांक ०८/१०/२०२५ रोजी ड्रोन च्या सहाय्याने विशेष मोहीम राबवून काटोल उपविभागातील पोलीस ठाणे जलालखेडा, काटोल, नरखेड येथील अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस ठाणे जलालखेडा हद्दितील मौजा उमठा (पारधी बेडा) येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळणारे व विक्री करणाऱ्या आरोपी विरोधात कारवाईबाबत विशेष मोहीम राबविली. सदर मोहीमेमध्ये **आरोपी क्रं १) रेसल्या मेन्या राजपूत, वय ३६ वर्षे रा उमठा ता नरखेड जि नागपूर, १) भाउसाहेब लक्ष्मण पवार, वय ६५ वर्षे रा उमठा ता नरखेड जि नागपूर, ३) महेंद्र राजेंद्र पवार वय ३५ वर्षे, रा उमठा ता नरखेड जि नागपूर, ४)सूरज हिरालाल सोलंकी वय ३३ वर्षे, रा उमठा ता नरखेड जि नागपूर आणि ०२ महीला आरोपी** यांचे ताब्यातुन एकुण ७० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ७,०००/— रूपयाचा मुद्देमाल तसेच ३,६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा किंमत १,२६,०००/— रूपयांचा माल तसेच १५ देशी दारूच्या निपा किंमत १,०५०/— रूपये तसेच दारू गाळण्याचे साहीत्य किंमत २७,०००/— रूपये तसेच एक विवो कंपणीचा ॲड्रॉईड मोबाईल किंमत २०,०००/— रूपये असा एकुण १,८१,०५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ड्रोन च्या सहाय्याने संपुर्ण परिसराची पेट्रोलिंग करून त्यांचे दारू गाळण्याचे भट्टया नष्ट करण्यात आल्या. सदर प्रकरणी जलालखेडा पोलीस स्टेशन येथे एकुण ०६ आरोपींवर

भारतीय न्याय संहीता कलम १२३ ( हानीकारण पदार्थ उपलब्ध करून देणे ) तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्‌यान्वये ०५ गुन्हे नोंदविण्यात आले असुन यातील **०३ आरोपी यांना अटक करण्यात आलेली आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**